# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.08.2025** **वारःमंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्सकी यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा; रशिया-युक्रेन संघर्षविरामाबाबत प्रयत्न करण्याची पंतप्रधानांची ग्वाही
2. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी दिलेल्या अण्वस्त्र धमकीचा भारताकडून तीव्र शब्दांत निषेध
3. अन्नदाता शेतकऱ्यांना उर्जादाता बनवणं ही काळाची गरज-केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन आणि
4. आशियाई अजिंक्यपद मुष्टीयुध्द स्पर्धेत भारताला 27 पदकं; रितीकानं पटकावलं सुवर्णपदक

**पंतप्रधान-झेलेन्स्की**

रशिया आणि युक्रेन यांच्यादरम्यान संघर्षविराम व्हावा आणि शांततेसाठीच्या वाटाघाटी लवकरांत लवकर सुरु व्हाव्यात यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न भारताकडून केले जातील अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्सकी यांना दिली. यासंदर्भात काल मोदींनी त्यांच्याशी दुरध्वनीवरुन संवाद साधला. अशी माहिती पंतप्रधानांनी समाजमाध्यमावर दिली आहे. भविष्यात युक्रेनबरोबर द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यावर भारत भर देईल असा विश्वासही मोदी यांनी झेलेन्स्की यांना दिला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि रशियाचे राष्ट्रपती व्लादिमिर पुतीन येत्या शुक्रवारी अलास्का इथं भेटणार आहेत या पार्श्वभूमीवर काल हे संभाषण झालं.

**ट्रंप-पुतीन**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि रशियाचे राष्ट्रपती व्लादिमिर पुतीन येत्या शुक्रवारी अलास्का इथं भेट घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर दोनही देशांदरम्यान व्यापार करार होण्याची शक्यता ट्रप यांनी वर्तवली आहे. तसंच रशिया आणि युक्रेनदरम्यान युध्दबंदी संदर्भात सकारात्मकता व्यक्त केली आहे. व्हाईट हाऊस इथं पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, रशियाच्या अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या स्थिती ही तिथल्या संघर्षामुळे आहे, अमेरिकेने रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर 50 टक्के कर लादल्याने त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला असल्याचं त्यांनी नमूद केलं. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आणि युरोपीय नेत्यांशी बोलण्यापूर्वी शांतता करारासाठी कोणते प्रयत्न केले जाऊ शकतात याबद्दल भेटीदरम्यान चर्चा होण्याची शक्यता आहे.

**परराष्ट्र मंत्रालय**

पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी दिलेल्या अण्वस्त्र धमकीचा भारतानं तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अण्वस्त्राच्या कोणत्याही धमकीला भीक घालणार नाही असं भारतानं आधीच स्पष्ट केल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. भारत आपल्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करणं यापुढेही सुरूच ठेवेल असं त्यांनी आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**संसद**

करकायदे सुधारणा विधेयक 2025 आणि नव्यानं मांडलेलं प्राप्तीकर विधेयक 2025 अशा दोन विधेयकांना काल लोकसभेनं मंजूरी दिली. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विरोधकांच्या गोंधळातच ही विधेयकं सभागृहात सादर केली. प्राप्ती कराविषयीचे कायदे एकत्रित करुन त्यात सुधारणा करण्याच्या उद्देशानं प्राप्तीकर विधेयक सादर करण्यात आलं आहे. 1961 च्या प्राप्तीकर कायद्यात आणखी सुधारणा करणं आणि वित्त विधेयक 2025 मध्ये दुरुस्ती करणं हा कर सुधारणा विधेयकाचा हेतू आहे. राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक आणि राष्ट्रीय उत्तेजक द्रव्य विरोधी कायद्यातील सुधारणा विधेयकालाही लोकसभेत गदारोळातच मंजूरी मिळाली.

**निवडणूक-आयोग**

पारदर्शकपणे राबवलेली निवडणूक प्रक्रिया लोकशाहीला बळकटी देते असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आणि राजदकडून करण्यात येत असलेल्या आरोपांसदर्भातील सत्यता पडताळताना निवडणूक आयोगानं ही बाब अधोरेखित केली.

बिहारमधील मतदार याद्यांच्या पुर्नरिक्षण कार्यक्रमासंदर्भात समाजमाध्यमावर चुकीची माहिती प्रसारित करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर आयोगानं बिहारमधील मतदार याद्यांसंदर्भातील सर्व दस्तऐवज आणि नियमित प्रसारित होणाऱ्या बातम्या आणि इतर माहिती समाजमाध्यमावर प्रसारित केली आहे. बिहारमधील एसआयआरशी संबंधित मतदारांकडून थेट प्राप्त झालेल्या 10 हजार 500हून अधिक दाव्यांपैकी 127 दावे आणि हरकती निवडणूक अधिकाऱ्यांनी आतापर्यंत निकाली काढल्या आहेत. असंही निवडणूक आयोगाने सांगितलं.

**<u>गडकरी</u>**

अन्नदाता असलेल्या शेतकऱ्यांना उर्जादाता बनवणं ही काळाची गरज आहे असं प्रतिपादन केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. जागतिक जैवइंधन दिनानिमित्त प्राज इंडस्ट्रीज संस्थेच्या वतीनं काल पुण्यात बायोव्हर्स उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राज संस्थेचे अध्यक्ष प्रमोद चौधरी उपस्थित होते. जैव इंधन आणि हरित हायड्रोजन उत्पादनाचा वापर वाढला तर भारत ऊर्जा निर्यातदार देश बनेल असा विश्वास व्यक्त करुन गडकरी म्हणाले.....

**और हमारा एक ड्रीम है कि हमारा किसान केवल अन्नदाता नहीं होगा। हमारा किसान ईंधनदाता है| हमारा किसान बिटुमिन दाता है। हमारा किसान हवाई ईंधन भी बना सकता है, बना रहा है। हमारा किसान हाइड्रोजन भी बना रहा है और आने वाले समय में पावर से लेकर इंधन। से लेकर बिटुमिन से लेकर हवाई इंधन तक अगर किसान बनाएगा तो हमारी एग्रीकल्चर सेक्टर की ग्रोथ कितनी बढ़ेगी एम्प्लॉयमेंट कितना क्रिएट होगा ग्रोथ में उसका कंट्रीब्यूशन क्रिएट होगा और आत्मनिर्भर भारत उससे कैसे बनेगा यही बात हमको समझने की आवश्यकता है।**

**<u>हर घर तिरंगा</u>**

आपला तिरंगा राष्ट्रध्वज देशाच्या एकतेचं प्रतिक आहे, असं प्रतिपादन केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी केलं आहे. हर घर तिरंगा अभियानासंदर्भात नवी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते काल बोलत होते. देशातल्या प्रत्येक नागरिकानं या अभियानात सहभागी व्हावं असं आवाहन त्यांनी केलं, राष्ट्रध्वजाबद्दल बोलताना ते म्हणाले......

**जो हम एक सौ चालीस करोड़ भारतीयों के सपनों को उनके अनगिनत बलिदानों की स्मृतियों को एकजुटता और साहस के साथ में घड़े हुए भारत के वादे को और विचार को अपने भीतर समेटकर भारत के लोगों को विकसित भारत का लक्ष्य प्राप्त करने के लिए निरंतर प्रेरित करता है और सामूहिकता। के भाव में बांधता है। आज भी जब घर पर जब व्यक्ति हाथ में तिरंगा लेकर खड़ा होता है और सम्मान के साथ में अपने घर की छत पर अपने घर की बालकनी पर अपने प्रतिष्ठान में तिरंगे को लहराता है तो निश्चित रूप से उसके मन में वही भाव होता है जो भाव शहीदे आजम भगत सिंह या उस समय के स्वतंत्रता सेनानियों के मन में था।**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या कथा आणि एकतेचं महत्त्व सांगणाऱ्या चित्रपटांच्या हर घर तिरंगा चित्रपट महोत्सवाला काल दिल्लीसह मुंबई, पुणे आणि चेन्नई इथं प्रारंभ झाला. राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळानं तीन दिवसांचा हा महोत्सव आयोजित केला आहे. मुंबईत या महोत्सवाचं उद्घाटन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या हस्ते झालं.

**<u>जागतिक हत्ती दिवस</u>**

पृथ्वीवरील सर्वात मोठ्या प्राण्यांपैकी एक असलेल्या हत्तींचं संरक्षण आणि संवर्धन व्हावं यासाठी दरवर्षी 12 ऑगस्ट हा दिवस जागतिक हत्तीं दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी तामिळनाडूमधील कोईमबतूर इथं जागतिक हत्ती दिनाच्या राष्ट्रीय उत्सवाचं आयोजन केला गेलं आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय तसंच तामिळनाडू वन विभाग यांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं उद्घाटन होणार असून या कार्यक्रमात हत्तींचं संवर्धन, मानव हत्ती संघर्ष सोडवणे या विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात आलं आहे.

**<u>ऑलिम्पियाड</u>**

18 व्या खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचं औपचारिक उद्घाटन आज मुंबईत होणार आहे. मुख्य वैज्ञानिक सल्लागार प्राध्यापक अजय कुमार सूद, अणुविज्ञान विभागाचे सचिव डॉ. अजय कुमार मोहंती आणि आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघटनेचे माजी उपाध्यक्ष प्राध्यापक अजय केंभावी यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेचं आत्तापर्यंतचं हे सगळ्यात भव्य स्वरूप असून 64 देशांमधून एकंदर 288 विद्यार्थी यात सहभागी होणार असल्याची माहिती स्पर्धेची आयोजक संस्था असलेल्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे संचालक प्राध्यापक अर्णब भट्टाचार्य यांनी काल वार्ताहर परिषदेत दिली. 10 दिवस चालणाऱ्या या स्पर्धेचा उद्देश खगोलशास्त्रात गती असणाऱ्या जगभरातल्या विद्यार्थ्यांना एका व्यासपीठावर एकत्र आणणं हे आहे, असं प्रतिपादन आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र

ऑलिम्पियाडचे अध्यक्ष प्राध्यापक अनिकेत सुळे यांनी केलं. भारताकडून पाच विद्यार्थ्यांचा चमू या स्पर्धेत सहभागी होणार असून त्याचं नेतृत्व हरविंदर कौर जस्सल आणि जसजीत सिंह बागला हे दोघे करणार आहेत.

**आशियाई**

बँकॉकमध्ये सुरु असलेल्या 19 वर्षांखालील आणि 22 वर्षांखालील आशियाई अजिंक्यपद मुष्टीयुध्द स्पर्धेत 80 किलो वजनी गटात महिलांच्या स्पर्धेत रितीकानं काल सुवर्णपदक पटकावलं. या विजयासह भारतानं या स्पर्धेत 27 पदकांची कमाई केली आहे. 19 वर्षांखालील गटात 3 सुवर्ण, 7 रौप्य आणि 4 कास्य पदके तर 22 वर्षांखालील गटात 1 सुवर्ण, 4 रौप्य आणि 8 कास्य पदकांचा समावेश आहे.

**हवामान-पाऊस**

हिमाचल प्रदेशात संततधार पावसामुळ नद्यांची पाणी पातळी स्तर वाढली आहे, त्यामुळं पर्यटक आणि स्थानिक नागरिकांनी हवामानाचा अंदाज घेऊनच बाहेर पडावं आशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. उत्तराखंड आणि हिमाचालप्रदेश मध्ये पुढील 7 दिवस मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिल असून पश्चिम बंगाल, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश, आसाम, आणि मेघलय मध्ये देखील येत्या गुरुवार पर्यन्त मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. तर आज बिहार, जम्मू- काश्मीर, लडाख, झारखंड, अंदमान आणि निकोबर बेटांवर काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.